
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### नवरा बायकोच्या भांडणाच्या कारणावरून घेतला गळफास

**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**



राहत्या घरी नवरा बायकोच्या भांडणाच्या कारणावरून छताच्या लाकडी वाश्याला साडीच्या साह्याने एका युवकाने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.यात हकीकत अशी की, प्रेम अंकुश जाधव वय २१ राहणार तळे हिप्परगा, उत्तर सोलापूर हा राहत्या घरी छताच्या लाकडी वाश्याला नवरा बायकोच्या भांडणाच्या कारणावरून साडीच्या साह्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. नातेवाईकांनी गळफासातुन सोडवून उपचारासाठी दि. २२ फेब्रुवारी रोजी शासकीय रुग्णालय येथे भाऊ सागर जाधव यांनी दाखल केले. उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



### तुझ्या आईकडून पैसे आण म्हणत विवाहितेस मारहाण

**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

घरी असताना मला दुसरे लग्न करायचे आहे, तुझ्या आईकडून पैसे आण असे म्हणून तिघांनी मिळून एका विवाहितेस लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.या हकीकत अशी की, निशा निलेश वाघमारे वय ३० रा. हनुमान नगर, न्यू बुधवार पेठ सोलापूर या अरण ता. माढा, जि. सोलापूर येथे पतीच्या घरी असताना मला दुसरे लग्न करायचे आहे, तुझ्या आईकडून पैसे आण असे म्हणून पती निलेश वाघमारे व इतर दोन जणांनी मिळून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. निशा यांना मानेस, पाठीस अवघड जागेच्या ठिकाणी मार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे ते स्वतः दाखल झाले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे

### लाकूड, बेल्ट व लोखंडी रॉडने एकास मारहाण

**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

विनाकारण सहा जणांनी मिळून लाकडाने, बेल्टने, लोखंडी रॉडणे एका युवकास मारहाण केल्याचा प्रकार सोलापूर जिल्ह्यात घडला आहे. या हकीकत अशी की, सोपान महादेव कातोरे वय २१ राहणार दहिवली, ता. माढा, जि. सोलापूर याला दहिवली येथील एम एस एस शाळेजवळ विनाकारण सुरज नलवडे व ऋषिकेश काळेकर व इतर चार जणांनी मिळून लाकडाने, बेल्टने, लोखंडी रॉडणे मारहाण केली. सोपान याला सर्वांगास व डोक्यास मुकामार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे मित्र अजित खंडावकर यांनी दाखल केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### मिरवणूक बघून जात असताना लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

मिरवणूक बघून जात असताना अज्ञात कारणावरून एकास लाथा बूक्क्याने मारहाण करण्यात आली आहे. यात हकीकत अशी की, सिद्धू रामण्णा लच्छानी, वय ४५ राहणार मंद्रूप ता. दक्षिण सोलापूर याला मंद्रूप येथील बाजार चौकातून मिरवणूक बघून जात असताना अज्ञात कारणावरून लाथा बूक्क्याने मारहाण करण्यात आली. त्यांना सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना मंद्रूप येथे दाखल करण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी रेफरने शासकीय रुग्णालय सोलापूर येथे ते स्वतः दाखल झाले, अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली.

### चाकूने युवकास तिघांनी मिळून केली मारहाण

**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

रोडवर विनाकारण अज्ञात तीन जणांनी मिळून एका युवकास चाकूने मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार सोलापूर जिल्ह्यात घडला आहे.यात हकीकत अशी की, प्रदीप कांबळे वय २१ राहणार बोरोटी स्टेशन अक्कलकोट, जि. सोलापूर याला बोरोटी येथील रेल्वे बिल्डिंगच्या समोरील रोडवर विनाकारण अज्ञात तीन जणांनी मिळून चाकूने मारहाण केल्याने त्यामध्ये पोटात जखम झाली. उपचारासाठी सरकारी दवाखाना अक्कलकोट येथे दाखल करण्यात आले होते. तेथून पुढील उपचारासाठी रेफरने शासकीय रुग्णालय येथे मित्र सोमनाथ माने यांनी दाखल केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली.

# भाजपाचे पुढील लक्ष्य जिल्हा मध्यवर्ती बँक




### असे निवडणार संचालक

जिल्हा बँकेत एकूण १९ संचालकांची निवड होते. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून ११, तर महिला, अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी, भटक्या-विमुक्त, नागरी बँका, दुग्ध संस्था, वैयक्तिक सभासद आणि कृषी-साखर कारखाने अशा घटकांतून प्रत्येकी एक संचालक निवडला जातो.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

जिल्ह्यातील नगरपरिषद, महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये दमदार यश मिळवल्यानंतर आता भाजपचे लक्ष्य सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डीसीसी) निवडणुकीवर केंद्रीत झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. ''भाजपने सगळंच जिंकलं, आता डीसीसी बाकी!'' अशी भावना जुन्या-नव्याने दाखल झालेल्या कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

जिल्हा बँकेची शेवटची निवडणूक डिसेंबर २०१५मध्ये झाली होती. त्यावेळी भाजपकडे सहकारमंत्रीपद आणि पालकमंत्रीपद असूनही अपेक्षित यश मिळाले नव्हते. मात्र गेल्या काही वर्षांत जिल्ह्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे एकहाती वर्चस्व निर्माण झाले आहे. त्यामुळे डीसीसीच्या निवडणुकीतही पक्ष अधिक आक्रमक भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे.

### मुख्यमंत्र्यांची भूमिका निर्णायक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. बँक सध्या नफ्यात येऊ लागली असली तरी एनपीए सुमारे १५ टक्क्यांवर आहे. थकबाकीचा प्रश्न निकाली निघाल्यास डीसीसीची निवडणूक लवकरच जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अक्कलकोटमधून सचिन कल्याणशेट्टी आणि पंढरपूरमधून समाधान आवताडे हे आमदार म्हणून दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. त्यांनी तालुका पातळीवरील सहकार क्षेत्रात प्रभावी प्रवेश केला आहे. बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार राजन पाटील, दिलीप माने, जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, जिल्हा परिषद सदस्या रश्मी बागल यांसारख्या नेत्यांच्या भाजप प्रवेशामुळे पक्षाची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. आमदार बाबासाहेब देशमुख, शहाजी पाटील आणि संजयमामा शिंदे यांची भूमिका देखील भाजपपूरक मानली जाते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वामुळे पक्ष संघटनात्मकदृष्ट्या अधिक सक्षम झाला आहे. दरम्यान, जिल्हा बँकेतील कर्जवाटप आणि आर्थिक अनियमिततेप्रकरणी न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. काही माजी संचालकांवर नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, त्या विरोधातील अपील प्रलंबित आहे. तसेच बँकेची निवडणूक घ्यावी यासंदर्भातील याचिकेवरही निर्णय बाकी आहे. बँकेची आर्थिक स्थिती निवडणुकीसाठी सक्षम आहे का, याचा अंतिम निर्णय सहकार आयुक्तांकडून होणे अपेक्षित आहे.

# शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर केला पाहिजे



### कस्तुरबाई एज्युकेशनमध्ये राष्ट्रीय परिषदेप्रसंगी डॉ. राजशेखर हिरेमठ यांचे मत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक दृष्टीने वापर केला पाहिजे असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. राजशेखर हिरेमठ यांनी मांडले.

कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ''माध्यमिक आणि उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रगत तंत्रज्ञानाची भूमिका आणि भविष्य'' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या परिषदेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे माध्यमिक व उच्च शिक्षणामध्ये असणारी भूमिका व अध्यायावत तंत्रज्ञानाची भूमिका यासंदर्भात सखोल चिंतन करण्यात आले.

या परिषदेमध्ये रविकिरण चव्हाण यांनी माध्यमिक शिक्षणामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेची असणारी भूमिका व कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने या विषयावर प्रत्यक्ष कृत्रिम बुद्धिमत्तेचे वैविध्यपूर्ण साधने यांचा वापर करून सविस्तर माहिती दिली. संप्रीत पटेल यांनी उच्च शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका या विषयांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता संदर्भात असणारी विविध सॉफ्टवेअर व त्यांचा क्षणामध्ये असणारा उपयोग याबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिक्षणामध्ये योग्य रीतीने वापर केला व मानवी मूल्य यांची जपणूक केली तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमाने शिक्षणाची गती अधिक होईल याबाबत मार्गदर्शन केले.

या परिषदेत महाराष्ट्रातील सोलापूर, कोल्हापूर, सांगली, नांदेड, धाराशिव व पुणे जिल्ह्यातून ११९ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. तसेच या परिषदेमध्ये फक्त प्राध्यापकच नव्हे तर पीएच.डी. संशोधक व पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी हेही सहभागी झाले होते. प्रस्तुत परिषदेमध्ये ६६ संशोधकांनी कृत्रिम बुद्धिमत्तेची शिक्षणातील भूमिका यासंदर्भात आपले संशोधन पेपर सादर केले तसेच आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशितही केले. प्रास्ताविक परिषदेचे समन्वयक डॉ. आयेशा रंगरेज यांनी केली. सह समन्वयिका डॉ. गीता मासाळ यांनी आभार मानले.

## आला उन्हाळा



**स्वेटरची दुकाने बंद**

सोलापूर : नॉर्थकोट प्रशालेच्या बाजूला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील थंडीच्या दिवसात भरगच्च दिसणारी स्वेटरची दुकाने उन्हाळ्यामुळे बंद करण्यात आली आहेत. सोलापुरातील हे तिबेटी स्वेटर विक्रेते आपापली दुकाने बंद करून तीन महिन्याच्या सुट्टीवर गेली आहेत.



**हातपंप दुरुस्तीला वेग**

सोलापूर : उन्हाळा सुरु होत असल्यामुळे शहरातील महानगरपालिकेच्या हातपंपाच्या दुरुस्तीला वेग आला आहे. रेल्वे स्टेशन परिसरात भाजी मंडईजवळ टिपलेले छायाचित्र (छायाचित्रे : केवल तिवारी)

# चूक कोणाची; तहकूब योग्य की अयोग्य?



### महापालिकेच्या पहिल्याच सभेत तणावाचा स्फोट

### स्वीकृत सदस्यांच्या यादीने वाढवला गोंधळ

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

शहराच्या राजकारणात नवा अध्याय सुरू होण्याआधीच सोलापूर महापालिकेच्या पहिल्याच सभेत गोंधळाचे सावट पसरले. सोलापूर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत स्वीकृत सदस्यांच्या घोषणेदरम्यान झालेल्या विसंगतीने सत्ताधारी आणि प्रशासन दोघांनाही अस्वस्थ केले. नऊ जागांपैकी आठच नावे जाहीर होणे आणि त्यानंतर वेगळी संख्या वाचली जाणे या प्रकारामुळे सभागृहात संभ्रम निर्माण झाला.तांत्रिक मुद्द्याच्या आधारावर विरोधकांनी घातलेला गोंधळ समर्थनीय नव्हता.

विषयांतर होत राहिले.सभाच भरकटली आणि अखेर सभा तहकूब करण्याची वेळ आली. पहिल्याच दिवशी महापालिकेत तणावाचा स्फोट झाला. नियम, जबाबदारी आणि राजकीय परिपक्वतेची कसोटी लागली. बहुमत असूनही सत्ताधाऱ्यांची कोंडी झाली. बहुमत असताना सभागृह ठप्प, प्रक्रियेतील चुका की राजकीय अस्वस्थता? तहकूब निर्णयावर चर्चा रंगली आहे.

सोलापूर महापालिकेची पहिलीच सर्वसाधारण सभा शुक्रवारी महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सोलापूर महापालिकाच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत झालेल्या गोंधळामुळे शहराच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटले आहे. स्वीकृत सदस्यांच्या घोषणेदरम्यान झालेल्या प्रक्रियात्मक विसंगतीमुळे सभागृहात तणाव निर्माण झाला आणि अखेर सभा तहकूब करण्याची वेळ आली. या पार्श्वभूमीवर काही मूलभूत प्रश्न उपस्थित होत आहेत. नेमकी चूक कोणाची? दोष कोणाचा? आणि तहकूब करण्याचा निर्णय योग्य होता का? स्वीकृत सदस्यांच्या घोषणेत गोंधळ झाला. महापालिका कायदा आणि ठरलेल्या कार्यपद्धतीनुसार स्वीकृत सदस्यांची नावे स्पष्ट, पूर्ण आणि नोंदवहीत अचूकपणे जाहीर होणे आवश्यक असते. मात्र नऊ जागांपैकी आठच नावे जाहीर झाली आणि त्यानंतर नगरसचिवांकडून वेगळी संख्या वाचली गेल्याने संभ्रम वाढला. ही केवळ तांत्रिक चूक नव्हती, तर प्रशासनिक आणि राजकीय समन्वयातील त्रुटी मानली जात आहे.

सत्ताधारी ८८ आणि विरोधक १४ असे बलाबल आहे. बहुमत असलेल्या सत्ताधाऱ्यांकडून अधिक शिस्तबद्ध तयारी अपेक्षित असते. त्यामुळे प्राथमिक जबाबदारी सत्ताधारी पक्षाच्या नियोजनातील कमतरतेवर येते. तांत्रिक मुद्द्याच्या आधारावर विरोधकांनी घातलेला गोंधळ समर्थनीय नव्हता. वास्तविक पाहता उर्वरित एक सदस्याची घोषणा पुढील सभेत करण्याचे निश्चित झाले होते. अर्थातच तो अधिकार सभागृहाचा आहे. तरीही या विषयावर अधिक भर देऊन गोंधळ झाला. परिणामी इतर विषय बाजूला सारले गेले किंबहुना विकासाच्या मुद्द्यांना दुय्यम स्थान मिळाले आणि सभाच भरकटली. विरोधकांनी विकासात्मक प्रस्ताव आणि विषयांना अधिक प्राधान्य दिल्यास निश्चितच सभेचा उद्देश सफल होईल अन्यथा सभा तहकुबीचा सिलसिला असाच कायम राहील.

नगरसचिव यांनी स्पष्ट व एकसंध माहिती देणे अपेक्षित होते. वेगवेगळे आकडे जाहीर झाल्याने गोंधळ अधिकच वाढला. प्रशासन तटस्थ आणि अचूक राहणे ही लोकशाही प्रक्रियेची मूलभूत गरज आहे. येथे संवादातील विसंगतीमुळे परिस्थिती चिघळल्याचे दिसून आले. सभागृहात नगरसेविका श्रद्धा पवार यांनी उपस्थित केलेला प्रश्न प्रक्रियात्मक स्पष्टतेशी संबंधित असल्याने तो वैधानिक चौकटीत बसणारा होता. मात्र त्या प्रश्नानंतर निर्माण झालेला गोंधळ हा केवळ एका व्यक्तीच्या मुद्द्यापेक्षा सत्ताधारी-प्रशासनातील समन्वयाच्या कमतरतेचे प्रतीक ठरला. त्यामुळे प्रश्नापेक्षा त्यावर दिलेले अपुरे व विसंगत उत्तरच परिस्थिती चिघळण्यास कारणीभूत ठरल्याचे स्पष्ट झाले. एकूण चित्र पाहता, प्रक्रियात्मक चूक सत्ताधाऱ्यांकडून झाल्याचे स्पष्ट होते. विरोधकांचा मुद्दा नियमाधारित असला तरी त्यांची शैली आक्रमक ठरली आणि तहकूब हा निर्णय नियमसंगत असला तरी व्यवस्थापनातील आणि समन्वयातील कमकुवतपणाचे द्योतक ठरला आहे.

बहुमताचा दावा होता पण पहिल्याच सभेत प्रक्रियेची शिस्त कोलमडली. प्रश्न यादीचा नव्हता, तर नेतृत्व आणि समन्वयाच्या तयारीचा होता. सभा तहकूबने गोंधळ थांबला पण राजकीय परिपक्वतेवरचे प्रश्न अधिकच गडद झाले असल्याचे चित्र पाहायला मिळाले.



### विरोधकांची आक्रमक भूमिका : नियमभंग की हक्क?

सभागृहात मुद्दा उपस्थित करणे, हरकती नोंदवणे आणि यादी पुन्हा वाचण्याची मागणी करणे हे विरोधकांचे वैधानिक अधिकार आहेत. त्या दृष्टीने त्यांची मागणी नियमाधारित होती. मात्र डायससमोर घोषणाबाजी करणे आणि कामकाज ठप्प करणे ही कृती सभागृहाच्या शिस्तनियमांच्या चौकटीत बसत नाही. डायसवर जाऊन धिक्कार करणे लोकशाहीच्या मर्यादेत बसत नाही यामुळे विरोधकांचा मुद्दा योग्य असला तरी त्यांची पद्धत आक्रमक आणि नियमबाह्य ठरते. लोकशाही व्यवस्थेत आक्षेप नोंदवण्याचा अधिकार असतो, परंतु तो संस्थात्मक शिस्तीच्या चौकटीतच वापरणे अपेक्षित आहे, असा सूर राजकीय वर्तुळातून उमटत आहे.

### सभा तहकुब : वैधानिक अधिकार की राजकीय बचाव ?

सभागृहात गोंधळ वाढल्यास अध्यक्षांना सभा तहकूब करण्याचा अधिकार असतो. नियमांनुसार शिस्त राखणे आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यास कामकाज स्थगित करणे ही अध्यक्षांची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने पाहता, तात्कालिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी तहकूब करण्याचा निर्णय वैधानिक होता. मात्र पहिल्याच सभेत, सत्ताधाऱ्यांकडे स्पष्ट बहुमत असताना, स्वतःच्या प्रक्रियात्मक गोंधळामुळे सभा तहकूब करावी लागणे हा राजकीयदृष्ट्या बचावात्मक निर्णय ठरला. नेतृत्वाची तयारी आणि समन्वय याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

### सत्ताधारी पक्षाची जबाबदारी काय ?

स्वीकृत सदस्यांच्या घोषणेत स्पष्टतेचा अभाव दिसून आला.कामकाजाच्या पूर्वतयारीत कमतरता स्पष्ट दिसून आली. सभेपूर्वी अंतर्गत समन्वयात त्रुटी आढळल्या आहेत. यामुळे सभेवेळी ८८ सदस्यांचे महाबहुमत असलेल्या सत्ताधारी पक्षाने सभा शास्त्र, आवश्यक रणनीती, पूर्वतयारी, संभाव्य अडचणी, पक्षांतर्गत समन्वय, जबाबदारी वाटप, तातडीचे निर्णय या संदर्भात परफेक्ट नियोजन करणे आवश्यक आहे. ते दिसून आले नाही. सत्ताधारी काही नगरसेवक विरोधकांना मदत होईल अशी कार्यपद्धती करत नाहीत ना ? पहिल्याच सभेत काही जणांकडून विषयांतर का करण्यात आले ? उत्तराला प्रश्न का असे पडले ? त्या दृष्टीने वेळीच हस्तक्षेप महत्त्वाचा ठरतो. पार्टी मीटिंगमध्ये आवश्यक ते धडे देण्याची गरज होती. लोकशाही व्यवस्थेत बहुमत म्हणजे केवळ संख्या नव्हे; तर शिस्त, तयारी आणि प्रक्रियेचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारीही तितकीच मोठी असते. हे महत्वाचे आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३६४

**पर द्रव्य परनारी ।**
**यांचा घरी विटाळ ॥**

प्रत्येकाला आपल्या घरात सुख शांती ही असावी वाटते. त्यासाठी जवळपास सर्वच लोक प्रयत्नशीलही असतात. पण माणूस जेव्हा भौतिक सुखालाच खरे सुख, समाधान मानून त्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील राहतो, तेव्हा तो कळत न कळत आहे त्या सुख समाधानापासून दूर जाऊ लागतो. कारण भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी बऱ्याचवेळा नको ते करावे लागते. भौतिक सुख हा विषय अमर्याद आहे. या अमर्याद विषयामध्ये इंद्रिय सुखाचा समावेश होतो. नितीनियमानुसार इंद्रिय सुख मिळवले तर सुख समाधान आहे. मात्र इंद्रियांचे लळे पुरवून सुख मिळवायचे ठरवले तर दु:ख आहे. पण भौतिक सुखाला जो व्यक्ती खरे सुख समाधान मानतो त्याला इंद्रिय सुखापासून दुरावणे कधीही पटणारे नसते. खा, प्या ऐश करा अशी अशी मनोवृत्ती जोपासणारा माणूस आत्मसुखाकडे पाहू शकत नाही. आत्मसुख ही परीभाषा भौतिक सुखाचा विचार करणऱ्यांना पटतही नाही. इंद्रीयांचे लळे पुरविण्यासाठी त्याला परद्रव्य, परनारी आपलेच वाटू लागतात. त्यांच्या प्राप्तीसाठी तो नितिनियमाला सहज पायदळी



तुडवतो. पण ज्याला आत्मज्ञानाचा मार्ग सापडला आहे, तो पर द्रव्यावर, पर नारीवर स्वप्नातही मन जाऊ देत नाही, त्याला जणू या दोन्हीचा विटाळच असतो. त्याची ही मनोवृत्ती त्याच्या घरात खऱ्या सुख समाधानाला जन्म देते. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, परद्रव्य परनारी । त्यांचा घरी विटाळ ॥

दुसऱ्याचे द्रव्य, दुसऱ्याचा अधीकार आपल्या ताब्यात घेण्यासाठी, त्याचा उपभोग घेण्यासाठी अनेकजण सदैव प्रयत्नशील असतात. म्हणूनच समाजात चोऱ्या, खून, बलात्कार, फसवेगीरी होत असलेले पाहायला मिळतात. समाजात जे गुन्हे घडतात त्यातील बरेचसे गुन्हे हे द्रव्य, सत्ता, स्त्रीवरील अन्यायाशी संबंधित असतात. आपल्या पत्नीकडे, माता, भगिणीकडे कोणीही वाईट नजरेने पाहू नये असे वाटणारे अनेक लोक परस्त्रीकडे मात्र वाईट नजरेने पाहतात. परद्रव्य व परनारीचा हव्यास केवळ एक कुटूंब उधवस्त करतो असे नव्हे तर दोन्ही बाजूचे कुटूंब उधवस्त करतो. कुटूंबांची ही उधवस्तता समाजावर विपरित परीणाम करणारी असते. परद्रव्य, परनारीचा हव्यास करणाऱ्या कुटूंबात मुलांवर चांगले संस्कार होत नाहीत. या वाईट घटनेचे मुलेही साक्षीदार असतात. प्रत्यक्ष डोळ्याने अशा घटना पाहत गेल्याने मुलांची मनोवृत्ती बिघडू शकते. आपल्या चुकीच्या वृत्तीमुळे आपली मुलं बिघडत असतील तर यापेक्षा कुटूबांची जास्त हानी दुसऱ्या कशानेही होत नाही, हे लक्षात असावे. आपल्या मुलांवर चांगले संस्कार होण्यासाठी आपण चांगले वागले पाहीजे. आपली मुलं आपलं अनुकरण करीत असतात. त्यामुळे घरी, बाहेर आपले वर्तन चांगले ठेवणे ही आपली जबाबदारी आहे.

जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# संत निरंकारी मिशनच्या वतीने स्वच्छता मोहीम

## उपमहापौर देवकर यांच्यासह नगरसेविकांनीही हाती घेतला झाडू
## धर्मवीर संभाजी महाराज तलाव परिसर केला चकाचक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

विजापूर रोडवरील धर्मवीर संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) येथे संत निरंकारी मिशनच्या वतीने सकाळी ८ ते १२ यावेळेत स्वच्छ जल, स्वच्छ मन अभियान अंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. युनिटी लेक व्ह्यू बोट क्लबचे प्रवेशद्वार ते धोबीघाट परिसराच्या वाकिंग ट्रॅकच्या दुतर्फा स्वच्छता केली. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्यासह नगरसेविकांनीही हाती झाडू घेऊन स्वच्छता केली. सुमारे ४00 सेवकांनी ८ टन कचरा संकलित केला.

तलावाच्या कडेला असलेला कचरा, कपडे, प्लास्टिक बाटल्या इत्यादी कचरा जमा करण्यात आला. ६ घंटागाड्या मार्फत



८ टन कचरा महानगरपालिकेने संकलित केला. या अभियानास प्रोत्साहन देत उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका संगीता जाधव आणि नगरसेविकांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता केली.या अभियानात संत निरंकारी मिशनचे क्षेत्रिय प्रभारी इंद्रपालसिंह नागपाल, पंचायत समिती सदस्य पंचप्पा धनशेट्टी , नगरसेविका संगीता जाधव, प्रभाग २१ नगरसेविका संगीता शंकर जाधव, संगीता जाधव, विभागीय अधिकारी किशोर तळीखेडे, मुख्य आरोग्य निरीक्षक सूर्यकांत लोखंडे, कालीदास कोरे, सुनिल भालेराव, संजय जोगदंडकर, कार्तिक पवार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर म्हणाल्या, संत निरंकारी मिशनचे कार्य उल्लेखनीय आहे. सामाजिक कार्यात मिशनचे योगदान आहे. आपल्या सर्वांच्या प्रयत्नातूनच हा परिसर स्वच्छ होणार आहे. सजग नागरिकच आपला परिसर स्वच्छ ठेऊ शकतात. यासाठी जागरूकता आवश्यक आहे.

संत निरंकारी मिशनप्रमाणेच इतर सामाजिक संस्थेने यात सहभाग घेऊन सातत्य कायम ठेवावे, जेणेकरून परिसर कायम स्वच्छ राहील. महानगरपालिकेचे आवश्यक ते सहकार्य असेल, असे आवाहन त्यांनी केले. सत्संग मंडळाचे सदस्य, महानगरपालिकेचे कर्मचारी व सुमारे ४00 सेवादल स्वयंसेवक व भाविक भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने या मोहिमेत सहभाग नोंदवला.

## मराठी भाषा दिनानिमित्त शुक्रवारी रंगणार ‘काव्यधारा’ कवी संमेलन

**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिन आणि 'मराठी भाषा गौरव दिना'चे औचित्य साधून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, सोलापूर शाखेच्या वतीने 'रंगवर्धन' उपक्रमांतर्गत ‘काव्यधारा’ या विशेष कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता मोदीखाना येथील नाट्य परिषदेच्या स्व. पद्माकर देव सभागृहात संपन्न होणार आहे. मराठी भाषेचे संवर्धन आणि साहित्याचा जागर करण्याच्या उद्देशाने आयोजित या संमेलनाची संकल्पना नाट्य परिषदेचे ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांची आहे. या काव्यमैफिलीत सोलापुरातील डॉ. शिवाजी शिंदे, मारुती कटकधोंड, डॉ. रामचंद्र धर्मसाले, संगीता एखंडे, प्रांजली मोहीकर यांचा सहभाग आहे. नाट्य परिषदेचे अध्यक्ष आणि माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात येत आहे. सोलापूरकर रसिकांना दर्जेदार साहित्याची मेजवानी मिळणार आहे, असे प्रमुख कार्यवाह प्रा. जोतिबा काटे यांनी कळवले आहे.




## कृषी उपसंचालकपदी निवडीबद्दल शुभम सदाफुले यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत कृषी उपसंचालक पदावर घवघवीत यश संपादन केल्याबद्दल शुभम सदाफुले यांचा बहुजन विचार मंचच्या वतीने रमाई ॲकॅडमीच्या क्लासमध्ये सत्कार करण्यात आला.

बहुजन विचार मंचचे अध्यक्ष व सेवानिवृत्त कृषी उपसंचालक आबासाहेब साबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी रमाई अकॅडमीचा विद्यार्थी स्वप्नील नडगिरी हे रेल्वे मध्ये टि.सी.पदी नियुक्ती झाल्याबद्दल नवयान अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष प्रदीपकुमार कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. अरुणकुमार इंगळे यांनी शुभम व स्वप्नील यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले. याप्रसंगी नवयान अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष प्रदीपकुमार कांबळे, ॲड. संजीव सदाफुले, आबासाहेब साबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास बहुजन विचार मंचचे उपाध्यक्ष व्ही.डी. गायकवाड, भाऊसाहेब लंकेश्वर, जितेंद्र वाघमारे, रत्नदीप कांबळे, संघपाल माने, बाबासाहेब बनसोडे, विजय खराडे, विद्याताई सदाफुले, विशाखा उबाळे व रमाई अॅकॅडमीचे प्राचार्य ए.ए.सोनकांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन शाम शिंगे यांनी केले तर आभार मिलिंद ताकपेरे यांनी मानले.

## उर्दू मित्र व जीवन गौरव पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

अ.भा.उर्दू साहित्य संमेलन समितीच्या वतीने दरवर्षी उर्दू दिनानिमित्त मराठी भाषिकातून उर्दू भाषा अवगत असणाऱ्या व उर्दू भाषेवर प्रेम करणाऱ्या एका मान्यवरांचा ‘उर्दू मित्र’ म्हणून, तर उर्दू साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात तसेच उर्दू भाषेच्या विकासासाठी उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना त्यांच्या योगदानासाठी गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

यावर्षी ॲड. के. चंद्रमोहन यांना उर्दू मित्र म्हणून तर शिक्षण क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या प्रा. नासीरोद्दीन आळंदकर तर साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे प्रसिध्द कवि आरजु राजस्थानी यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार तसेच सत्कारमुर्तीना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शॉल व श्रीफळ तसेच प्रत्येकी पाच हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. प्रा. इसाक मुजावर अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख अतिथी म्हणुन डॉ.फहिम गोलीवाला उपस्थित होते. प्रा. रियाज वळसंगकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमास रफिक नल्लामंदु, जावीद उस्ताद, रफिक खान, हारुण बंदुकवाला, हुसेन बक्षी, इक्बाल सय्यद, इरफान कारीगर उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. अशफाक सातखेड यांनी केले तर शफी शेख यांनी आभार मानले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार,**
**दि. २३ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन शु. षष्ठी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- भरणी (१६.३३)**
**योग - ब्रह्मा (१०.१८)**
**करण - गरज (२०.०६)**
**राहू काल : सोमवार स. ७.३० ते ९.००**
**दिनविशेष : संत गाडगे महाराज जयंती.**

**१९४७: आंतरराष्ट्रीय मानक संस्थाची स्थापना झाली.**
**१९९६: कोकण रेल्वेच्या मार्गावरील रत्नागिरीतील कारबुडे बोगद्याचे (भारतातील त्यावेळचा सर्वात लांब रेल्वे बोगदा) काम पूर्ण.**
**२०१२: इराक मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यांच्या मालिकेत ८३ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला.**
**१९६६: सीरियामध्ये लष्करी बंड होऊन सरकार उलथवून टाकण्यात आले.**

## शिवजयंतीनिमित्त ४५0 नागरिकांची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

शिवजयंतीनिमित्त श्री हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान व स्वर्गीय प्रमोद महाजन युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून बापूजी नगर येथे नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या आरोग्य शिबिरामध्ये ४५0 नागरिक व मुलांची तपासणी करण्यात आली व गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

या शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, पूर्ण रक्त तपासणी, थायरॉईड तपासणी, त्वचारोग तपासणी, स्त्रीरोग तपासणी तसेच जनरल मेडिसिन तपासणी अशा विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिबिरासाठी अश्विनी हॉस्पिटल कुंभारी,




सोलापूर कॅन्सर हॉस्पिटल, एस. एल. हॉस्पिटल, सेंट्रल हॉस्पिटल, सेल्फी हॉस्पिटल तसेच छत्रपती श्री शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी मोलाची सेवा दिली. याप्रसंगी पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, देविदास कुमार, अंबादास म्हेत्रे, प्रमोद महाजन युथ फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जयंत होलेपाटील, श्री हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीधर आरगोंडा, हिंदुराष्ट्र सेनेचे शहर अध्यक्ष रवि गोणे, युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम, हणमंतू श्रीराम आदी मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सोमनाथ बंदपट्टे, गीता गोणे, शिवम्मा बंदपट्टे, अजय गोणे, अमर पोतराज, विनायक कुरापाटी, महेश पेद्दी, लक्ष्मण गुंडेटी, सागर तलवार, सागर सातलोल्लू, सागर म्हेत्रे, किरण शिंगे, दिनेश वल्लापोल्लू, विकास गड्डम, लक्ष्मण दासरी आदींनी परिश्रम घेतले.



## ‘मेरा युवा भारत’ मेगा पदयात्रेत वालचंद महाविद्यालयाचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

भारत सरकार यांच्या वतीने शिवजयंतीनिमित्त मेरा युवा भारत या अभियानांतर्गत मेगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्रशासनाच्या वतीने चार पुतळा (हुतात्मा चौक) ते जिल्हा परिषद कार्यालय या मार्गावर पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत वालचंदच्या कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थी तसेच एनसीसीचे विद्यार्थी आणि सर्व शिक्षकांनी उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला. पदयात्रेच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक जीवराज कस्तुरे व क्रीडा शिक्षक राहुल हजारे यांनी परिश्रम घेतले.



## कौतुकाची थाप प्रगतीसाठी प्रेरणादायी : काळे

### दहा जणांना ‘समाज भूषण’ पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २२ फेब्रुवारी-**

विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करणे हा उपक्रम कौतुकास्पद आहे. ही कौतुकाची पाठीवर दिलेली थाप प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरेल असा विश्वास महापालिकेतील सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी व्यक्त केला.

भंडारकवठे विकास मंच आणि गुरु फॉर लाईफ फाउंडेशन, जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समाजभूषण पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. उद्योगपती श्रीशैल बहिरगोंडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य इकबाल तांबोळी (शैक्षणिक), नंदकुमार वारे (पत्रकारिता), कल्लप्पा फुलारी (शैक्षणिक), सुनीता ढवळेश्वर (शैक्षणिक), हणमंत पैलवान पुजारी (सामाजिक), हणमंत दहिवडे (उद्योजक), चिदानंद कोटगोंडे (कृषी), रवी राठोड (क्रीडा), राजश्री बहिरगोंडे (उद्योजिका) आणि प्रकाश जाधव (आदर्श पालक) यांना सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ देऊन समाज भूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक गुरु फॉर लाईफ फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष निंगराज विंचूरे यांनी केले. भंडारकवठेचे सरपंच भिमाशंकर बबलेश्वर, राज्य उत्पादन शुल्कचे सेवानिवृत्त अधिक्षक भीमाशंकर बिराजदार, माजी प्राचार्य रामचंद्र कुलकर्णी, मल्लिकार्जुन गुरव, उद्योगपती शशिकांत जिडीमनी, हनुमंत बहिरगोंडे, शिवशंकर वठारे, डी. डी. पाटील, सुरेश पाटील, चिन्नया स्वामी, जलवादी, मायप्पा कुंभार यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन कविता स्वामी व मनोरमा जिडीमनी यांनी केले तर रामचंद्र कुलकर्णी यांनी आभार मानले.

## ‘ट्रायंगल’ चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

‘‘ट्रायंगल‘‘ हा मराठी चित्रपटसृष्टीतला पहिला स्पाय थ्रिलर चित्रपट ठरणार असून, अर्जून करे हा नवा चेहरा या चित्रपटातुन प्रेक्षकांसमोर येणार आहे. देशभक्ती, निष्ठा आणि धाडसाची अनोखी गोष्ट या निमित्ताने मराठी भाषेतून मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लाँच करण्यात आले आहे.वैष्णवी फिल्म्सची निर्मिती असलेल्या ‘‘ट्रायंगल‘‘ या चित्रपटाची निर्मिती विकी सूर्यवंशी आणि सुखदेव आढाव यांनी केली असून लेखन आणि दिग्दर्शन विकी सूर्यवंशी यांनी केलं आहे.

# धर्मवीर बलिदान मासानिमित्त २११ जणांचे सामूहिक मुंडण

## धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना अभिवादन : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ फेब्रुवारी -**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या बलिदानानिमित्त महाराष्ट्रभर तसेच कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील अनेक भागात संपूर्ण फाल्गुन महिना धर्मवीर बलिदान मास पाळण्यात येतो. यानिमित्त रविवारी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या २११ धारकऱ्यांनी गणपती घाटावर सामूहिक मुंडण करून धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना अभिवादन केले.

सोलापूर शहरातील ११७, दक्षिण सोलापूर तालुक्यातील ५२ तर उत्तर सोलापूर तालुक्यातील ४२ जणांनी सामूहिक मुंडण केले. तसेच जिल्ह्यातील विविध तालुक्यातील धारकऱ्यांनी धर्मवीर बलिदान मासानिमित्त मोठ्या संख्येने मुंडण केले.

क्रूरकर्मा मुघल शासक औरंगजेब याने धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना पकडल्यानंतर महिनाभर त्यांचा प्रचंड छळ करून अत्यंत क्रूर हत्या केली. देव - देश



आणि धर्मासाठी धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांनी बलिदान दिले. त्यांची आठवण म्हणून हिंदू बांधवांकडून संभाजीराव भिडे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली फाल्गुन प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्या हा संपूर्ण महिना धर्मवीर बलिदान मास पाळला जातो.

या संपूर्ण महिन्यात चौकाचौकामध्ये दररोज महिनाभर धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना श्रद्धांजली वाहण्यात येते. तसेच हिंदवी स्वराज्याच्या छत्रपतींच्या निधनाचे सुतक संपूर्ण हिंदू समाजाला लागू असल्याच्या श्रद्धेतून महिनाभर चप्पल न घालणे, गोड न खाणे, मुंडण करणे, मांसाहार वर्ज्य करणे, गादी न वापरणे, आनंदाच्या कार्यक्रमाचे आयोजन न करणे, आनंदाच्या कार्यक्रमात सहभागी न होणे असे व्रत पाळले जाते.

सोलापूर शहरातही श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे धर्मवीर बलिदान मास पाळला जात असून ७८ ठिकाणी धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना दररोज श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. फाल्गुन अमावस्येच्या दिवशी (यंदा १८ मार्च) मुकपदयात्रेने धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना अभिवादन करून धर्मवीर बलिदान मासाची सांगता होणार आहे. रविवारी सकाळी सामूहिक मुंडण करण्यासाठी गणपती घाटावर तरुणांची मोठी गर्दी झाली होती. प्रारंभी घाटावर हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर तरुणांनी सामूहिक मुंडण केले. याप्रसंगी श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागाचे धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माळशिरसच्या ५८ गावांचा संभाव्य टंचाई आराखडा सादर; ४४० वाड्यांचाही समावेश

## पाणीपुरवठा अभियंता करवते यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.२२ फेब्रुवारी-**

तालुक्यातील सर्वच गावातील पाण्याची सध्याची स्थिती चांगली असून गतवर्षी मार्चमध्येच चार गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागला होता .यावर्षी मार्च नंतर डिसेंबर अखेर ५८ गावातील ४४० वाड्यावस्त्यावर संभाव्य पाणी टंचाई भासणार असून त्याचा आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती पाणीपुरवठा अभियंता एस.एन. करवते यांनी दिली. यावेळी एस.आर.करांडे उपस्थित होते.



गतवर्षी तालुक्यात मार्च मध्ये गारवाड, मगरवाडी, सुळेवाडी, बचेरी या ४ गावात, एप्रिलमध्ये शिंगोर्णी, शिवारवस्ती, निटवेवाडी, पळस तर मे मध्ये मंडळ, भांब, फडतरी व अन्य सहा गावात तर मे नंतर लोंढे मोहिते वाडी, कदमवाडी ,लोणंद, जळभावी, पठाणवस्ती अशा एकूण १६ गावात टँकरने पाणी पुरवठा करावा लागला होता. गतवर्षी सरासरीपेक्षा जास्त झालेल्या पावसामुळे सध्या पाण्याची स्थिती चांगली असून मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून काही गावात टंचाई भासू शकते यासाठी संभाव्य टंचाई आराखडा सादर करण्यात आला आहे. आज अखेर कोणत्याही गावाचा प्रस्ताव नसल्याची माहिती करवते यांनी दिली.

### तालुक्यातील तलाव, बंधारेमध्ये ३० ते ४० टक्के पाणी साठा उपलब्ध : तेजस चिखलीकर

तालुक्यात ८४ के टी वेर , असून त्याची साठवण क्षमता १२ हजार ३७१ टी सी.एम आहे,२१ गाव तलाव ,९९ पाझर तलाव,१७२ सिमेंट बंधारे असून यामध्ये सध्या ३० ते ४० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे तालुक्यात ९ पाझर तलावाची दुरुस्ती,४ सिमेंट बंधाऱ्याची दुरुस्ती,तर इस्लामपूर येथे एका नवीन बंधाऱ्याचे काम सुरु करण्यात आले असल्याची माहिती लघु पाटबंधारे उप अभियंता तेजस चिखलीकर यांनी दिली.

---

## महत्वाचे...



### पंचरत्न स्कूलमध्ये शिवजयंती साजरी

**पंढरपूर, दि. २२ फेब्रुवारी-**

पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिवजयंती उत्सव व बक्षीस वितरण समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या उत्सवांमध्ये जवळजवळ ४०० विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. शिवजयंती निमित्त शिवपूजन प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुनीता मोहळकर तसेच प्रशालेच्या शिक्षिका यांच्या हस्ते करण्यात आले. शिवजयंती निमित्त विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्रावर भाषण केले तसेच शिक्षकांनीही शिवचरित्राबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या ८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम शिवांश शिंदे, आरशान शेख, स्वरा चौधरी आरोहि आसबे, माहेश्वरी स्वामी यांनी मिळविला. द्वितीय भार्गवी तोडकरी, श्रेयस सोनवणे, स्वरा सोनवणे, ज्ञानेश्वरी हूच्चे यांनी प्राप्त केला. चित्रकला स्पर्धामध्ये प्रथम क्रमांक शिवांश शिंदे, मोहम्मद आता, सानवी सावंत, साईशा साठे, सहर्ष चांदणे, सिद्धार्थ सोनवले, द्वितीय समृद्धी शिंदे, स्वयंम चांदणे, विशालक्षी बाणेकर, अनुजा निळकंठ तृतीय ओविस आतार, स्वलेहा बागवान, समृद्धी आटकळे, हर्षल शिंदे तसेच रोल प्ले ऍक्टिव्हिटी, स्पीच कॉम्पिटिशन, ड्रॉइंग कॉम्पिटिशन, लाटीकाटी या स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी कविता जगताप, हर्षद्मी करंडे, निशा जाधव, सायली पोरे, वैशाली शिंदे, श्रद्धा दुरुगकर, मुग्धा चोबे, कल्पना हुच्चे, अश्विनी कुंभार, क्षितिज मोहोळकर, पृथ्वीराज पाटील यांनी परिश्रम घेतले.



### संगेवाडी येथे मंदिरांचा कळसारोहण संपन्न

**सांगोला, दि.२२ फेब्रुवारी-**

संगेवाडी (ता. सांगोला) येथे श्री महादेव मंदिर व श्री प्रभू अण्णा महाराज या मंदिरांचा कळसा रोहण सोहळा भास्कर वेदांताचार्य श्रीगुरु १०८ गुरुसिद्ध मणिकंठ शिवाचार्य दहिवडीकर महाराज यांच्या अमृत हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी कळसाची व गुरुची भव्य मिरवणूक गावातून काढून महामंगल आरती, माहेरवासीन ओटी भरण व भजन तसेच गुरुचे प्रवचन व महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी पुरोहित म्हणून महादेव स्वामी, ओम स्वामी, आकाश स्वामी यांनी काम पाहिले. याप्रसंगी वसंत खंडागळे, रावसाहेब ताटे, अचिकेत खंडागळे, समाधान होवाळ, नागनाथ नष्टे, सुधीर खंडागळे, सुभाष पाटील, चंद्रकांत खंडागळे, राजेंद्र पवार, हरि ताटे, बसवेश्वर पाटणे, रविराज स्वामी, नंदू स्वामी, स्वामी भाऊसाहेब, रविराज शेटे, सुधाकर खंडागळे, दीपक शिंदे, प्रभाकर पवार, धनाजी पवार, पांडुरंग खंडागळे, देविदास पवार, माणिक खंडागळे, गडया स्वामी उपस्थित होते.



### वांगीच्या सरपंचपदी दिवटे तर उपसरपंचपदी देशमुख यांची बिनविरोध निवड

**जेऊर, दि. २२ फेब्रुवारी-**

वांगी नं एक तालुका करमाळा येथील ग्रामपंचायतच्या सरपंच पदी सुरेखा दिवटे तर उपसरपंचपदी नरसिंग देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अकरा सदस्य असलेल्या या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत माजी जिल्हा परिषद सदस्य निळकंठ देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पॅनलला यश मिळाले होते. माजी सरपंच शुभांगी देशमुख यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त असलेल्या दोन्ही पदासाठी निवड कार्यक्रम जाहीर केला होता. यामध्ये सरपंचपदासाठी सुरेखा दिवटे व उपसरपंचपदासाठी नरसिंग देशमुख यांचा एकमेव अर्ज आल्याने दोन्ही निवडी बिनविरोध पार पडल्या या निवडीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून मंडलाधिकारी विशाल गायकवाड यांनी काम पाहिले. यावेळी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी विद्यानंद पाटील, माजी सरपंच शुभांगी संतोष देशमुख, माजी उपसरपंच बाबासाहेब पाटील, तुकाराम देशमुख, कालिदास भोसले, हरिभाऊ तकीक, प्रताप देशमुख, हैबतराव देशमुख, संजय कदम, मगन दिवटे, गोरख देशमुख, तानाजी देशमुख, हनुमंत पाटील, धनंजय गायकवाड, राहुल जगताप, सचिन देशमुख, दत्ता देशमुख, दशरथ देशमुख, प्रकाश महाडिक, उपस्थित होते.

### आता तरी विज्ञानवादी व्हा : डॉ. चौधरी

**जेऊर, दि.२२ फेब्रुवारी-**

मानसिक गुलामगिरी झटकून विज्ञानवादी विचार स्वीकारणे काळाची गरज आहे. छत्रपती शिवरायांचे वास्तव विचार समाजात स्वीकारणे गरजेचे आहे असे मत उमरड येथे शिवजयंती निमित्तच्या व्याख्यानात प्रा. डॉ. संजय चौधरी यांनी व्यक्त केले. उमरड (ता.करमाळा) येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त दोन दिवशीय कार्यक्रमात राजे 'पुन्हा जन्माला या! या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानाची सुरुवात शाहीर बबन खरात यांच्या शाहिरीने करण्यात आली. यावेळी पत्रकार सुयोग झोळ, आदिनाथ कारखान्याचे संचालक श्रीमान चौधरी, संचालक राजाभाऊ कदम, मकाई कारखान्याचे संचालक बापूराव चोरमले, सरपंच प्रमोद बदे, माजी सरपंच संदीप मारकड, फौजमल पाखरे, अंकुश कोठावळे, धनंजय चौधरी, उपसरपंच समाधान वलटे, श्रीकृष्ण गोडगे, प्रदीप कोठावळे, बालाजी पाटील, श्रीकांत मारकड उपस्थित होते. प्रा. नंदकिशोर वलटे यांनी प्रस्ताविक केले. शिवरायांचे विचार वास्तवात न आल्यास लोकशाही धोक्यात जाऊ शकते असा इशारा डॉ. चौधरी यांनी दिला. राजे शिवाजी मंडळाचे नितीन बदे, अण्णा पडवळे, प्रज्योत बदे, गणेश चौधरी, मुकेश गायकवाड, विशाल मारकड, वैभव बदे, किरण वलटे, संजय कोठावळे, सचिन चोरमले, अंकित पडवळे यांनी परिश्रम घेतले.

---

## अभिनव मंडळातर्फे गणेश मूर्तीची बग्गीतून मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२२ फेब्रुवारी.**

करकंब (ता.पंढरपूर) येथे अभिनव तरुण मंडळ टिळक चौक करकंब यांचेवतीने जयपूर येथून आणलेल्या सुंदर अशा संगमरवरी गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना टिळक चौक येथील मंदिरामध्ये करण्यात येणार आहे.त्यानिमित्ताने दि.२१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी या गणेशमूर्तीची बग्गीतून पारंपारिक वाद्ये, टाळ मृदुंग व हरिनामाच्या गजरात गावामधून मिरवणूक काढण्यात आली.




श्रीगणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सोहळा साजरा करण्यासाठी विजय फडणीस, राजेश शहा, संजय शेटे, अरुण काळे, प्रवीण नागरस, पांडुरंग व्यवहारे, संतोष पिंपळे, आत्माराम चवरे, आनंद लिगाडे, आनंद देशमुख, अमित जोशी, काका देशमुख, शार्दुल शहा, महादेव तेली, मनोज शहा, सौरव देशमुख, संतोष शेटे, सुयोग नागरस आर्दीनी परिश्रम घेतले.

## हभप शिवाजीराव मोरे यांना 'राजा शिवछत्रपती समाजभूषण' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ फेब्रुवारी-**

सामाजिक, आध्यात्मिक व पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे हभप शिवाजीराव महाराज मोरे यांना त्यांच्या कार्याची दखल घेत प्रतिष्ठेचा 'राजा शिवछत्रपती समाजभूषण' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राजा शिवछत्रपती सामाजिक संस्था, सातारा यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.



वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांनी समाजात पर्यावरणाबाबत सकारात्मक जागृती निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याचा महाराष्ट्रासह देशातील अनेक संस्थांकडून गौरव करण्यात आला आहे. पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील योगदानाबद्दल मोरे महाराज यांना विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

> मोरे महाराज यांनी 'निर्मल वारी' व 'हरित वारी' यांसारख्या अभियानांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन, समाजप्रबोधन व आध्यात्मिक कार्याचा प्रभावी संगम घडवून समाजासमोर नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा 'राजा शिवछत्रपती समाजभूषण' पुरस्काराने झालेला सन्मान ही अभिमानास्पद बाब आहे. त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा.
>
> **- गहिनीनाथ महाराज औसेकर, सहअध्यक्ष, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर.**

---

## पोलीस अधीक्षकांची तत्परता; सूचना नाही, तर केली अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.२२ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी नुकतीच माळशिरस पोलीस ठाण्याला भेट दिली. यावेळी त्यांनी उर्वरित जागेत झाडे लावण्याच्या सूचना देत रोपे देणार असल्याचे सांगितले. त्यानुसार नुसत्या सूचना न देता अंमलबजावणी करत त्यांनी रोपे पाठवली आहेत. त्यामुळे येथे वृक्षलागवड सुरू झाली आहे.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी हे माळशिरस येथे प्रशिक्षणार्थी पोलीस अधीक्षक म्हणून असताना त्यांनी पोलीस स्टेशन परिसरात अनेक वृक्षांचे रोपण केले होते. ती झाडे आता मोठी झाली आहेत. भेटीवेळी अन्य मोकळ्या जागेत, भिंतीच्या कडेला झाडे लावण्याच्या सूचना देत त्यांनी रोपे पाठवतो असे सांगितले होते. त्यानुसार त्यांनी आंबा, चिंच, नारळ, जांभूळ, पिपरन यासह शोभेची व औषधी रोपे पाठवली आहेत. अकलूज विभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके, पोलीस निरीक्षक विकास दिंडुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी सचिन डुबल, सतीश रोकडे व होमगार्ड अमोल झेंडे यांच्यासह पोलिस वृक्ष लागवड करीत आहेत.

> माळशिरस व नातेपुते येथील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी माळशिरस येथे नव्याने पोलीस वसाहत बांधण्याचा व या बांधकामाचे भूमिपूजन करण्याचा मानस पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी व्यक्त केला होता. त्यानुसार संबंधित विभागाशी संपर्क करून जुनी इमारत पाडण्याच्या सूचना अकलूज उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. आता हे पाडकाम होऊन नव्या इमारत झाल्यास माळशिरसच्या वैभवात भर पडणार असून उलाढाल वाढणार असल्याने काम कधी सुरू होणार याकडे पोलिसांसह माळशिरसकरांचे लक्ष लागले आहे.



## बार्शीत मुस्लिम मावळ्याच्यावतीने शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ फेब्रुवारी-**

बार्शी शहर व तालुक्याच्यावतीने उडान फाउंडेशनच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांची शिवजयंती साजरी करण्यात येते.

यावेळी उडान फाउंडेशनच्यावतीने शिवसृष्टी या ठिकाणी पुष्पहार अर्पण करुन व समाजातील वंचित दुर्बल घटकापैकी पारलिंगी, सफाई कर्मचारी, नर्स, माता भागिनींचा यावेळी शिवजयंतीनिमित्त गौरव करुन छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव साजरा करण्यात आली.

यावेळी कार्यमाचे अध्यक्ष सचिन वायकुळे, प्रमुख पाहुणे डॉ. मौलाना शेख, डॉ. गुलाब अंगारशा, सुलतान शेख, जय शिवराय प्रतिष्ठान अध्यक्ष विजय राऊत, छत्रपती ग्रुपचे अध्यक्ष टिंकू पाटील, माजी नगरसेवक कय्युम पटेल, सादिक मुल्ला यांनी यावेळी मार्गदर्शन केले तर उडान फाउंडेशन अध्यक्ष इरफान शेख, उपाध्यक्ष जाफर शेख, कार्याध्यक्ष शकील मुलाणी, सचिव जमील खान, सहसचिव अख्तर शेख, मोहसीन पठाण, अकिब पठाण, साजन शेख, सामीर वळसंगकर, राजु शिकलकर, रज्जाक शेख, खाजा पठाण, साजिद मुल्ला, तोसिफ बागवान, गणेश गोडसे, स्वप्नील पोकळे, अमोल झांबरे, सलमान बागवान, रहीम शेख, शहबाज मुल्ला, शहाबाज मुलाणी उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण कोकाटे यांनी तर जमील खान यांनी आभार मानले.

---

## अक्कमहादेवी मंदिरासमोरील सभामंडपाच्या बांधकामाचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ फेब्रुवारी-**

येथील शहरातील श्री अक्कमहादेवी मंदिरासमोरील नवीन सभामंडपाच्या बांधकामाचे भूमिपूजन तालुक्याचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते असंख्य भाविकांच्या उपस्थितीत भक्तिमय वातावरणात मोठया थाटात पार पडले.



मंदिर परिसराच्या विकासासाठी हा महत्त्वाचा टप्पा असून, भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या विशेष प्रयत्नातुन शासनाच्या माध्यमातून सुमारे ५१ लाख रुपये या सभामंडप उभारण्यासाठी देण्यात येणार आहे. हे सभामंडप उभारल्यानंतर मंदिरात येणाऱ्या भाविकांना धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन व सामाजिक उपक्रमांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. अक्कलकोट शहराच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेला बळ देणारा हा उपक्रम ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त केली.

या पवित्र सोहळ्यास म.नि प्र. बसवलिंग महास्वामीजी, भाजपचे जेष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी, दूधनी मार्केट कमिटी सभापती अप्पु परमशेट्टी, श्रीशैल भरमशेट्टी, चंद्रकांत स्वामी, नगरसेवक अविनाश मडीखांबे, शशिकांत बकरे, महेश हिडोळे, देविदास कविटगी, विक्रम शिंदे, अपर्णाताई सिद्धे, अशोक जाधव, अंकुश चौगुले, सद्दाम शेरीकर, लक्ष्मण समाणे, रवी बकापुरे, राजकुमार कांदे, मल्लिनाथ येरेगुंटे, मंतेश अडवीतोटे, शिवशंकर चनशेट्टी, सुभाष आंदोडगी, मल्लिनाथ माळी उपस्थित होते.

## पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**

पोलीस मुख्यालय, सोलापूर ग्रामीण येथे पोलीस दलातील अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये डॉ हेमंत लोढा (रुद्राक्ष थेरपी) यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची तपासणी केली. या आरोग्य शिबिरामध्ये सोलापूर ग्रामीण पोलीस घटकातील सुमारे २०० पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उपस्थिती दर्शवली. डॉ हेमंत लोढा यांनी त्यांची तपासणी करून त्यांच्यावर योग्य उपचार केले तसेच त्यांना रुद्राक्ष थेरपी देण्यात आली. हे आरोग्य शिबिर देखील उर्वरित पोलीस अधिकारी व अंमलदार यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन करत पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्य संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे आयोजन वेळोवेळी करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले. या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक. कुंभार, पोवार, देशपांडे, सहा पोलीस निरीक्षक, कदम, जकिकोरे तसेच रापोनि कांबळे उपस्थित होते.

---

# माझी वसुंधरा ५.० अभियानात पंढरपूर नगरपरिषदेचा डंका

## राज्यात तृतीय क्रमांक पटकावून मिळविला बहुमान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ फेब्रुवारी -**

राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियानात ५० हजार ते १ लाख लोकसंख्या गटांमध्ये पंढरपूर नगरपरिषदेस राज्यात तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा अभियान पुरस्कार सोहळा शनिवारी मुंबई येथे अत्यंत सन्मानपूर्वक पार पडला.




या अभियानांतर्गत ५० हजार ते १ लाख लोकसंख्या गटामध्ये आपल्या पंढरपूर नगरपरिषदेस राज्यात तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार म्हणजे केवळ एक सन्मान नसून, स्वच्छता, हरित क्षेत्र वाढ, पर्यावरणपूरक उपक्रम, नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि शाश्वत विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची पावती आहे. पंढरपूर शहराने पर्यावरण रक्षणाच्या दिशेने उचललेली प्रत्येक पायरी राज्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या गौरव सोहळ्याला राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने हा सन्मान नगराध्यक्षा डॉ.प्रणिता भगीरथ भालके, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, मुख्याधिकारी महेश रोकडे, विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी व मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# वीज बील तत्काळ भरण्याचे शाखा अभियंत्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.२२ फेब्रुवारी-**

शासनाच्या वतीने थकीत वीज ग्राहकांची जोडणी तोडण्याचे आदेश दिले असून थकीत वीज बिल ग्राहकांनी तत्काळ भरून ही कारवाई टाळावी असे आवाहन विज वितरण कंपनीचे माळशिरस शाखा अभियंता शितल डोळे यांनी केले आहे.

या शाखा अंतर्गत १३५० ग्राहकांकडे २४ लाख ११ हजार ७९० रुपये,व्यावसायिक १३७ ग्राहकांकडे ३ लाख २३ हजार ८६१ रुपये, १२ कारखानदार ग्राहकांकडे ७८ हजार ९१ रुपये, ६१ सार्वजनिक ग्राहकांकडे ११ लाख १० हजार ७८३ रुपये तर इतर ३ ग्राहकांकडे ९५ हजार ७४४ असे ४० लाख २० हजार २८१ रुपये विज बिल थकीत असून ग्राहकांनी विज बिल न भरल्यास विज पुरवठा खंडित केला जाणार असल्याचे सांगून कारवाई टाळण्यासाठी विज बिल भरण्याचे आवाहन डोळे यांनी केले आहे.



## महत्त्वाचे

### अजितदादांनी गेल्या शिवजयंतीला दिलेली जबाबदारी आयुष्यभर विसणार नाही : तांबोळी

**मंगळवेढा, दि.२२ फेब्रवारी-**



गेल्या वर्षी १९ फेब्रुवारी,छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पावन दिवशी, शिवस्वराज्य यात्रेसारखी भव्य आणि ऐतिहासिक जबाबदारी माझ्यासारख्या एका मुस्लिम मावळ्याच्या खांद्यावर सोपवण्याचा धाडसी आणि विशासाचा निर्णय अजितदादा पवार यांनी घेतला तो क्षण आयुष्यभर विसणार नाही अशी कृतज्ञता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी यांनी व्यक्त केली आहे. तांबोळी म्हणाले, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही मला ही जबाबदारी दिली. तो क्षण आजही आठवला की मन भरून येतं छाती अभिमानाने भरून येते. एका मुस्लिम मावळ्याला,एका ओबीसी घटकातील सामान्य कार्यकर्त्याला इतक्या मोठ्या यात्रेची जबाबदारी देऊन दादांनी संपूर्ण महाराष्ट्राला एक स्पष्ट संदेश दिला-त्यांच्या राजकारणात जात नाही, धर्म नाही; माणूस आहे, कर्तृत्व आहे आणि विशास आहे. प्रत्येक घटकाला मानसन्मान देणं, जबाबदारी देणं आणि विशास ठेवणं हीच दादांची खरी ओळख होती. तो क्षण,ती जबाबदारी आणि तो विशास मी आयुष्यभर विसरू शकणार नाही. शब्दांनी नाही, तर कृतीतून मी ती जबाबदारी प्रामाणिकपणे आणि यशस्वीपणे पार पाडली. दादांसोबत काम करताना मिळालेला अनुभव,त्यांचं मार्गदर्शन आणि तयार झालेलं हे जीवाळ्याचं नातं हीच माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी शिदोरी आहे. माझ्या आयुष्याला दिशा देणारा जो विशास दादांनी दिला,त्यासाठी आयुष्यभर मी त्यांचा ऋणी राहीन असे ते म्हणाले.

### तीर्थ येथे गुरूवारी शिवगणेश प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण

**दक्षिण सोलापूर, दि.२२ फेब्रुवारी-**



श्रीक्षेत्र तीर्थ (ता.दक्षिण सोलापूर) येथे बांधण्यात आलेल्या शिव गणेश मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण गुरुवार दि.२६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता काशीपीठ जगद्गुरु१००८ पूज्य डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य भगवतपाद यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी गौडगाव मठाचे शिवाचार्यरत्न ष.ब्र. डॉ.जयसिध्देश्वर महास्वामी, मैंदर्गी गुरु संस्थान हिरेमठाचे ष.ब्र. नीलकंठ शिवाचार्य महास्वामी, नागणसूर मठाचे ष.ब्र.श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी, नंदगाव विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.राजशेखर महास्वामी,अक्कलकोट विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.बसवलिंग महास्वामी तसेच सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दि.२२ ते २५ फेब्रुवारीपर्यंत दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत शिव महापुराण वेदमूर्ती शरणबसव शास्त्री हे सुमधुरतेने प्रवचन करणार आहेत. त्यांना संगीतकार रुद्रेश गवई, तबलावादक निरंजन रुईकर यांची साथ संगत आहे. या आध्यात्मिक व धार्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवगणेश मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. श्री रामलिंगेश्वर शिक्षण संकुल, रामलिंगेश्वर देवस्थान पंच कमिटी, तरुण मंडळ, योगीराजेंद्र पालखी संघ, अक्कन बळग, ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. शिवगणेश मंदिराची निर्मिती प्रा.डॉ.भीमाशंकर बिराजदार व कुटुंबीयांच्या भक्तिमय भावनेतून साकारली आहे.



### नगरपरिषदेत राज्य गीताचे गायन झाले नाही; भाजपाने मागितला खुलासा

**पंढरपूर, दि.२२ फेब्रुवारी-**

दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते. पंढरपूर नगरपरिषदे यावेळी राज्यगीताचे गायन अथवा वादन करण्यात आले नाही. महाराष्ट्र शासनाने केलेल्या निर्णयाची पायमल्ली करण्यात आली. याबाबतचा खुलासा पंढरपूर नगरपरिषदेकडून करण्यात यावा, तसेच यापुढे कोणत्याही शासकीय कार्यक्रमाच्या अगोदर राज्य गीताचे गायन अवश्य व्हावे, अशी मागणी भाजपचे पंढरपूर शहराध्यक्ष विक्रम शिरसाट यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. याप्रसंगी शहराध्यक्ष विक्रम शिरसाठ, नगरसेवक विनायक संगीत राव, नगरसेवक सौरभ थिटे, शिवभक्त बंटी वाघ,दत्तराज साळुंखे, समाजसेवक शंकर सुरवसे, श्रीनाथ संगीतराव आदी मान्यवर उपस्थित होते. राज्य शासनाने एक फेब्रुवारी २०२३ रोजी शासन निर्णय काढून प्रत्येक शासकीय कार्यक्रमात महाराष्ट्र गीत गायले जावे असा नियम लागू केला आहे. या नियमाची पायमल्ली पंढरपूर नगरपरिषदेने १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती दिनी केली आहे. यामुळे शिवभक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. याबाबतचा खुलासा पंढरपूर नगरपरिषदेने करावा, अशी मागणी भाजपचे पंढरपूर शहराध्यक्ष विक्रम शिरसाट यांच्याकडून करण्यात आली आहे. दरम्यान यापुढे कुठल्याही शासकीय कार्यक्रमात राज्य गीताचे गायन अवश्य करण्यात यावे अशी मागणी ही याप्रसंगी करण्यात आली आहे.

# अन्नछत्र मंडळाच्या शिवजन्मोत्सवाची मिरवणूकीने सांगता

## ८०० युवकांचे दिमाखदार लेझीम लक्षवेधी






**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२२ फेब्रुवारी-**

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व मंडळाचे सुरेशचंद्र सूर्यवंशी, अन्नछत्र मंडळाचे सचिव शामराव मोरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्यावतीने शिवजन्मोत्सवाची जय भवानी...! जय शिवराय...!! च्या जयघोषात निघालेल्या भव्य मिरवणूकीने सांगता झाली. या मिरवणुकीत अमोलराजे भोसले मित्र मंडळाच्या ८०० युवकांच्या लेझीम पथकाचा खेळ लक्षवेधी ठरला. शिवप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती.

मिरवणूकीची सुरूवात आमदार सचिन कल्याणशेट्टी, सोलापूरचे नगरसेवक अमोलबापू शिंदे, सोमपा परिवहनचे माजी सभापती राजन जाधव, भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, जि.प.सदस्य शिवराज म्हेत्रे, प्रवीण तानवडे, नगरसेवक तम्मा शेळके, प्रवीण शहा, देविदास कवटगी, दिलीप सिद्धे, मोतीराम राठोड, शिवशरण जोजन, नन्नु लाला राठोड यांच्या हस्ते झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांची विधिवत पूजन अप्पू पुजारी व सोमकांत कुलकर्णी यांच्या मंत्र पठणाने झाले. त्यानंतर छ६पती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांसह लेझीमच्या तालात मिरवणूकीला सुरूवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरील जुना राजवाडा समोरून कमलाराजे चौक, एवन चौक, नवा राजवाडा मार्गे, छ. शिवाजी महाराज चौक एस. टी. बसस्थानक, विजय कामगार चौक, कारंजा चौक, मेन रोड मार्गे, तूप चौक, फत्तेसिंह चौक ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे मिरवणुकीची सांगता करण्यात आली. मिरवणुकीस रामचंद्रराव घाटगे, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, विश्वस्त चंद्रकांत भाऊ कापसे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, प्रथमेश इंगळे, मैनुद्दीन कोरबू, सिद्धेश्वर मोरे, नन्नु कोरबू, सिद्धाराम टाके, शिवराज स्वामी, राम मातोळे, नागनाथ पाटील, पै. मौलाली शेख, बाळा शिंदे, यांची प्रमुख उपस्थिती होती. मिरवणुकीचे विविध सामाजिक संघटना व पक्षाने स्वागत केले. मिरवणूक यशस्वीसाठी अमोलराजे भोसले मित्र मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश सुरवसे यांनी केले.

याप्रसंगी शिवजन्मोत्सव अध्यक्ष आकाश शिंदे, उपाध्यक्ष योगेश पवार, सचिव सुमित घाटगे, श्रीधर गुरव, खजिनदार शितल फुटाणे-जाधव तर कार्याध्यक्ष -विशाल कलबुर्गी, राजू पवार, फहिम पिरजादे, आकाश सूर्यवंशी मिरवणूक प्रमुख- संतोष भोसले, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, निखील पाटील, गोटू माने, सनी सोनटक्के, सागर सोमवंशी लेझीम संघ व्यवस्थापक- वैभव मोरे, योगेश पवार, प्रथमेश पवार, मंगेश सूर्यवंशी, अमित घाटगे शिवजयंती स्टेज व मिरवणूक ट्रॉली सजावट प्रमुख- राहुल मोरे, वैभव कामनुरकर, समर्थ घाटगे, अनंत क्षीरसागर व्यवस्थापक- मनोज निकम, राजाभाऊ नवले, नितीन शिंदे, सौरभ मोरे, रोहित खोबरे, संजय गोंडाळ सत्कार प्रमुख- अशिष हुंबे, प्रशांत कडबगावकर प्रसिद्धी प्रमुख- प्रशांत भगरे, प्रवीण देशमुख, सोमशेखर जमशेट्टी, शंभूलिंग अकतनाळ, मिडिया प्रमुख अतिश पवार उपस्थित होते.

# वैराग ग्रामीण रुग्णालयाचा करारनामा रखडला

## ११ मार्चपासून अमरराजे निंबाळकरांचा आमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२२ फेब्रुवारी-**



येथील प्रस्तावित ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयासाठी राज्य शासनाने मंजूर केलेल्या जमिनीचा करारनामा अद्याप प्रलंबित असल्याने हा प्रश्न चांगलाच पेटला आहे. प्रशासनाकडून होत असलेल्या या टाळाटाळीच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते अमरराजे निंबाळकर यांनी ११ मार्चपासून वैराग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

**नेमके प्रकरण काय?**

वैराग व परिसरातील २५ ते ३० गावांतील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. या रुग्णालयासाठी वैराग शहरातील गट क्रमांक ४२२/२ मधील एकूण ४ हेक्टर ४५ आर जमिनीपैकी २ हेक्टर ४५ आर जमीन महाराष्ट्र शासनाने मंजूर केली आहे. या जमिनीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर यांनी ५ जानेवारी २०२६ रोजी उपजिल्हाधिकारी पत्राद्वारे बार्शीच्या तहसीलदारांना करारनामा करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, वरिष्ठ कार्यालयाचे स्पष्ट आदेश असतानाही बार्शी तहसीलदारांकडून या प्रक्रियेत दिरंगाई होत असल्याचा आरोप अमरराजे निंबाळकर यांनी केला आहे.

**आरोग्य सेवा रामभरोसे**

सध्या वैराग परिसरातील रुग्णांना तातडीच्या उपचारासाठी, प्रसूती सेवेसाठी किंवा प्राथमिक उपचारांसाठी बार्शी किंवा सोलापूरकडे धाव घ्यावी लागते.

ग्रामीण रुग्णालय सुरू झाल्यास स्थानिक पातळीवर ३० खाटांची सुविधा उपलब्ध होईल, तात्काळ आपत्कालीन सेवा मिळणे सोपे होईल, गरीब व गरजू रुग्णांचा प्रवासाचा खर्च व वेळ वाचेल, परंतु, केवळ जमिनीचा करारनामा न झाल्याने संपूर्ण प्रकल्पाची पुढील कार्यवाही ठप्प झाली आहे.

**प्रशासनाला शेवटचा इशारा**

जर हा करारनामा १० मार्च २०२६ पर्यंत पूर्ण झाला नाही, तर ११ मार्च रोजी सकाळी १० वाजल्यापासून आमरण उपोषणाला सुरुवात करणार असल्याचे निवेदन निंबाळकर यांनी दिले आहे. या इशाऱ्यानंतर प्रशासन खडबडून जागे होऊन तातडीने हालचाली करणार का, याकडे संपूर्ण बार्शी तालुक्याचे लक्ष लागले आहे.



# ...अखेर वेळापूर-अकलूज रस्त्याच्या कामाला सुरुवात

## मिलिंद सरतापे यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २२ फेब्रुवारी-**

अकलूज-वेळापूर रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनधारक, विद्यार्थी यांना होणारा त्रास थांबावा यासाठी करण्यात आलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या आंदोलनामुळे अखेर रस्ता दुरूस्तीच्या कामाला सुरूवात झाली आहे.

तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली वेळापूर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. रस्त्याच्या कामाला त्वरित सुरुवात करावी अन्यथा बांधकाम विभागाला टाळे ठोकून हलगी नाद आंदोलन करणार असा इशाराही देण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता सुनीता पाटील यांच्या वतीने लेखी पत्र दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले होते. अखेर आंदोलनाचा धसका घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या वतीने जवळपास ४८.३७ लाख रुपये निधी मंजूर करून प्रत्यक्ष खड्डे बुजवण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

सदरचे खड्डे बुजवण्याचे काम दर्जेदार व्हावे यासाठी तालुकाध्यक्ष सरतापे यांनी भेट देऊन संबंधितांना योग्य त्या सूचना दिल्या. हा रास्ता अतिशय खडतर झालेला आहे. प्रत्येक वेळी डागडुजी केली जाते या रस्त्याची खुदाई करून नव्याने रस्त्याची बांधणी करण्यात यावी किंवा हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाकडे वर्ग करणे गरजेचे असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

> इंदापूर-जत हा राष्ट्रीय महामार्ग आहे परंतु वेळापूर अकलूज हा ११ कि.मी. रस्ता वगळण्यात आला आहे. वेळापूर-अकलूज हा ११ कि.मी. रस्ता राष्ट्रीय महामार्गाकडे वर्ग करण्यात यावा यासाठी रिपाइंच्या वतीने खासदार धैर्यशील मोहिते- पाटील,आमदार उत्तमराव जानकर यांच्या मध्यमातून लढा सुरू राहणार आहे.
> **- मिलिंद सरतापे तालुकाध्यक्ष** रि.पा.इं.आठवले

# अर्धनारी-माचणूर बंधाऱ्यावर बसवले १०० दरवाजे

## खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रयत्नाला यश; शेतकऱ्यांना होणार लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २२ फेब्रुवारी-**

अर्धनारी-माचणूर येथील शेतकरी व ग्रामस्थांनी सातत्याने मांडलेल्या मागणीची दखल घेत खासदार प्रणिती शिंदे यांच्या पाठपुराव्यामुळे उजनी पाटबंधारा विभागातर्फे या बंधाऱ्यावर तब्बल १०० दरवाजे बसविण्यात आले.



या कामामुळे परिसरातील पाणी साठवण क्षमतेत लक्षणीय वाढ होऊन शेकडो शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळत आहे. बंधाऱ्यावर दरवाजे बसविल्यानंतर नदीपात्रात पुरेसा पाणीसाठा निर्माण होत असून अर्धनारी व माचनूर परिसरातील शेती सिंचनासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे खरीप व रब्बी पिकांसाठी पाण्याची उपलब्धता वाढली आहे. आज झालेल्या पाहणीदरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी बंधाऱ्याच्या कामकाजाची प्रत्यक्ष माहिती घेतली. यावेळी बंधाऱ्यावर विधीवत पूजन करण्यात आले. यावेळी अर्धनारीचे सरपंच पवार, माचणूरचे माजी सरपंच बबन सरवळे यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. या कामाबद्दल ग्रामस्थांनी खासदार शिंदे यांचे आभार मानले. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, प्रदेश सचिव रवीकरण कोळेकर, शहराध्यक्ष राहुल घुले, मनोज माळी, नाथा ऐवळे, रणजीत पाटील, आयेशा शेख, पंडित पाटील, सुनिता अवघडे, अभिमन्यू बेद्रे, अकबर मुलानी, राजू ठेंगील, संदीप पवार, शहाजी कांबळे उपस्थित होते.

# 'शिवरत्न' मध्ये स्पर्धा परीक्षा ॲकॅडमी सुरु करणार : शितलदेवी मोहिते-पाटील

## वार्षिक स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२२ फेब्रुवारी-**

शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलने अल्पावधीतच चांगला नाव लौकिक मिळवला आहे. या स्कूल मधील विद्यार्थ्यांना सैनिक शाळेत प्रवेश मिळावा तसेच केंद्रीय नवोदय विद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी तयारी करून घेतली जाईल. त्यासाठी खास ॲकॅडमी सुरू करणार असल्याचे आश्वासन शितलदेवी मोहिते-पाटील यांनी दिले.

शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल चा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा स्मृतिभवन या ठिकाणी दिमाखात पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. सहकार महर्षी शंकररावजी मोहिते-पाटील आणि श्रीमती रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या प्रतिमांना अभिवादन करून शिवरत्न उत्सवाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलनाने झाला. यावेळी माळशिरसचे गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, प्रसिद्ध रीलस्टार आर. जे. सागर भालेराव, ताराराणी कुस्ती केंद्राच्या अध्यक्षा कु ईशितादेवी धैर्यशील मोहिते-पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, सदस्य नितीन बनकर, शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलचे चेअरमन रामकृष्ण काटकर, तसेच सदस्य एच.डी. भोसले, शंकर गायकवाड, शिवदत्त नारायणकर, केंद्रप्रमुख विठ्ठलराव काळे, जि.प. आदर्श प्राथमिक शाळा यशवंत नगरचे मुख्याध्यापक बंडू खडतरे, एसएमपी स्कूलचे प्राचार्य अल्बर्ट थारकन, शिवरत्न स्कूलच्या प्रिन्सिपल बिनो पाऊलसो, शिक्षक-पालक संघाचे उपाध्यक्ष सचिन बोरावके, शिवरत्न अकॅडमीचे राजकिरण माने-देशमुख, मॅथ्स ओलंपियाडच्या संचालिका मेघा घुले उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध विषयावर नाटिकांसह नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांच्या नृत्यासोबतच महिला पालकांनी देखील नृत्याचा आनंद घेतला. यावेळी शैक्षणिक, कला आणि इतर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.




प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. प्रिन्सिपल जितेंद्र माने देशमुख यांनी प्रास्ताविक केले. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील यांचे मार्गदर्शनाबद्दल धन्यवाद देत कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. अध्यक्षांनी शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६- २७ साठी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणार असल्याचे सांगितले. शिवरत्न उत्सवामध्ये छोटा गट, मोठा गट व इयत्ता पहिली ते आठवीच्या २४८ विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर आपला कलाविष्कार सादर केला. स्वागत गीत, शेतकरी गीत, राजस्थानी गीत, गुजराती गीत, कांतारा, बॉलीवूड साँग, मराठी गीत व इतर गीतांनी प्रेक्षकांना टाळ्यांची दाद मिळाली. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित शाळा मराठी या गाण्याने सर्वच उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता आठवीतील ज्योती औदुंबर सावंत आणि प्रणाली श्रीनिवास मुळे या दोघींनी सूत्रसंचालन करून आभार मानले.